**नि.फौ.प्र. क्र. १०५/२०२४**
**शासन—वि—मिना**
**नि.क्र. १२**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

माझे नांव :— शफीक नुरमोहम्मद शेख
वय :— ३० वर्षे, धंदा :— सलुन,

राहणार :—आकुर्डी, दत्तवाडी, पुणे.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री. एस. के. राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

दि. १५.११.२०२२ रोजी सकाळी ०८.०० ते ८.१५ चे सुमारास मी आमची सलुनची दुकान जी शिवकुमार जाधव यांचेकडुन भाडयावर घेतली होती ती उघडली. काही वेळानंतर दुकानावर माझे वडिल दुकानावर आले व काही वेळानंतर आरोपी मिना तेथे येउन दुकान अमाचे मालकीचे आहे, तुम्ही येथे काय करत आहे असे म्हणुन दमदाटी करित होती. तसेच दुकानात येणारे ग्राहकांना सुध्दा मिना व तिचा मुलगा दमदाटी करुन हाकलुन देत होती. आरोपीने माझे वडिलांना तुमचे डिपॉझीट दोन दिवसात परत करते तुम्ही गुपचु दुकान खाली करुन निघुन जा अशी धमकी देत होती. घटनेचेपुर्वीसुध्दा आरोपी ही आम्हाला खुप त्रास दयायचे व ते आमचे दुकानासमोर कचरा फेकुन दयाचे व दुकानाचे लॉक व शटर वर शेण टाकायचे. आमचे दुकानाची भिंत व आरोपीचे घरची भिंत एक होती. आरोपी लोक भिंतीला छिंद्र पाडुन त्यातुन शेण व मुत्र टाकायचे. मी घटनेबद्दलचे व्हिडीओ रेकॉर्डींग करुन पोलीसांना दिले होते. त्यांनतर तपासादरम्यान पोलीसांनी माझे बयाण नोंदविले आहे.

२. मी आरोपीला ओळखतो ती आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**साक्षीदार यांचा उलटतपास आरोपीतर्फे स्वत: शपथेवर सुरु**

३. अभिकथित दुकान आम्ही नेमक्या कोणत्या तारखेला भाडयाने घेतली होती याबद्दल मला माहिती नाही. माझे वडिलांना माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला खुप वेळेस शिवीगाळ करुन धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की घटनेचे दिवशी आरोपीचे मुलाला मारहाण करुन

त्याचे गळा दाबला होता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीचा मुलगा उज्वल याला गाडीवर बसवुन काजगर चौक येथे नेले व त्याला पुन्हा दिसल्यास तुझा गेम करुन टाकेले अशी धमकी दिली. अभिकथित दुकानाचा करारनामा करण्यात आले किंवा नाही याबद्दल मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला कधीच धमकी दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की अभिकथित दुकानावर कब्जा करण्याचा माझे व माझे वडिलांचा हेतु नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने आम्हाला कधीच धमकावले नाही व गिन्हाईकला सुध्दा धमकुन हाकलुन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की अभिकथित घटना कधीच घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.03.21 17:08:57 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि.२१.०३.२०२५

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.03.21 17:09:03 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | :२१/०३/२०२५ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :२१/०३/२०२५ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : २१/०३/२०२५ |

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)